नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/03/2023 (मंगळवार) दुपार

---

## दुखापत

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत मौजा गळपुरा काटोल येथे दिनांक २०/०३/२०२३ चे १७.३० वा. ते १७.४० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— भोजराज धुर्वे, वय ४० वर्ष, रा. गळपुरा काटोल हा आपले घरी हजर असता एकटाच बडबडत घराचे बाहेर आला असता आरोपी नामे— संजय राऊत याने फिर्यादीला मला शिवीगाळ करतो असे म्हणुन पेचकसने छातीवर पोटावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना प्रविण पवार पोस्टे काटोल ९८२२७१६९१९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत देवलापार ५०० मीटर येथे दिनांक २०/०३/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— सगीर हनिफ अन्सारी, वय ३५ वर्ष, वार्ड नं. २ देवलापार हा आपल्या मुलाला घेवुन फोरव्हीलर गाडीने त्याला घरी सोडण्याकरिता जात असता यातील आरोपी नामे— करीम रशीदखॉ पठान, वय २८ वर्ष हा त्याचे गाडी समोर येवुन गाडी थाबंवुन फिर्यादी याला "तु मेरे भांजे को केसे लेके गया किसको पुछकर लेके गया" असे म्हणुन त्याचे हातातील लोखंडी पाईपने फिर्यादीचे डोक्यावर व छातीवर मारून जखमी करून शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे आई वडील झगडा भांडण सोडविण्याकरिता आले असता फिर्यादीचे आईला ढकल दुकल केल्यामुळे तिचे उजव्या हाताला मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि घोडके मॅडम पोस्टे देवलापार मो ८८३०६१४९५० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ०५ किमी अंतरावर देवलापार येथे दिनांक २०/०३/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— करीम रशीदखॉ पठान, वय २८ वर्ष यांचे घरासमोर त्यांचा भाचा नामे— सिबरान हा खेळत असता यातील आरोपी क्र. १) नामे— सगीर हनिफ अन्सारी यांने त्याचा मुलगा सिबरान याला घेवुन गेल्याचे फिर्यादी याला त्याचे पत्नीने सांगितले वरून फिर्यादी हा त्यांचा जावई आरोपी क्र. १ याला विचारपुस करण्याकरीता त्याचे घराकडे गेला असता आरोपी हा त्याचे मुलासोबत त्याचे घराजवळ दिसल्यावरून फिर्यादीने त्यास विचारले कि ''तु सिबरान को बिना पुछे मेरे घरसे क्यु लाया और बच्चा मेरे पास दे'' असे म्हटले त्यावरून आरोपी क्र. १ यांने फिर्यादी सोबत हातापाई करून आरोपी क्र. ३) नामे— हनिफ अन्सारी यांनी फिर्यादी याला पकडुन आरोपी क्र. २) मुन्नी हनिफ अन्सारी हिने तिचा हातातील वीट फिर्यादीच्या डोक्याला मारल्याने व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना सदिप नागोसे ब. नं १९७४ मो. नं ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**